शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूर अनुदानातून यंत्रसामुग्री खरेदीस प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : यंत्रख-२०२६/प्र.क्र.१२७/प्रशा-१,
गोकुलदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन गो.ते.संकुल,
९ वा मजला, मंत्रालय, मुंबई -४०० ००१.
दिनांक : २८ जुलै, २०२६

वाचा : आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.संवैशिवसं/स्किनबँक प्रस्ताव/जि.वा.योजना/११९०/२६, दिनांक २३.०३.२०२६.

शासन निर्णय :

विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानातून रूपये ८,४९,००,०००/- (अक्षरी रुपये आठ कोटी एकोणपन्नास लक्ष फक्त) (सर्व करांसहीत) इतक्या किंमतीची खालील तक्त्यात नमूद टर्न की तत्वावरील यंत्रसामुग्री खरेदी करण्यास या शासन निर्णयान्वये पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	यंत्राचे नाव	नग संख्या	प्रती नग किंमत (सर्व करांसहीत)	एकूण किंमत (सर्व करांसहीत)
१	State of Art Skin Bank on turnkey basis	१	८,४९,००,०००/-	८,४९,००,०००/-
एकूण (अक्षरी रुपये आठ कोटी एकोणपन्नास लक्ष फक्त)				८,४९,००,०००/-

अटी :-

१) सदर यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीची प्रशासकीय मान्यता संबंधित संस्थेस ५२-यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या उदिष्टाखाली जिल्हा वार्षिक योजनांतर्गत निधी उपलब्ध होण्याच्या अधिन राहून प्रदान करण्यात येत आहे. उपरोक्तसाठी राज्य योजनेतून निधी उपलब्ध होणार नाही.

२) सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ व अनुषांगिक शासन निर्णयांमध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

३) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावेत. सदर दर हे बाजारभावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने याबाबींचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबतची खातरजमा संबंधित अधिष्ठाता व संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावी.

४) सदर यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे (Technical specification) व्यापक, सर्वसमावेशक असून त्यानुसार साधनपुरवठा करु शकणारे किमान तीन उत्पादक/पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची असावीत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल, अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात आल्यानंतरच सदर बाबींची खरेदी प्रक्रिया करण्यात यावी.

५) प्रस्तावित यंत्रसामुग्रीचा समावेश इतरत्र कोणत्याही प्रस्तावात अंतर्भूत केलेला नसल्याबाबत/खरेदीची व्दिरुक्ती होणार नाही व सदर साधनसामुग्री संबंधित संस्थेस आवश्यक असल्याबाबत संबंधित अधिष्ठाता यांनी खात्री करावी.

६) सदर विषयी यंत्रसामुग्री खरेदीबाबत निर्णय घेताना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या मंजूर अनुदानाच्या तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) मुख्य यंत्र व त्यांचे सुटे भाग (Accessories) यांच्या किंमती भिन्न दर्शविणे आवश्यक राहील.

८) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

९) सदर यंत्रसामुग्रीसाठी कोणत्याही नवीन बांधकामाची, विद्युतीकरणाची तसेच नवीन पदनिर्मितीची आवश्यकता नसल्याची खातरजमा करण्यात आलेली आहे.

१०) उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ३.१.२ "किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा" या शीर्षकाखालील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मधील तरतूदीचे राज्यस्तरीय खरेदी समितीने अनुपालन करावे.

११) सदर टर्न की प्रकल्प विनिर्दिष्टे प्रमाणे स्थापित केल्याबाबत अधिष्ठाता यांनी खातरजमा करून घ्यावी.

२. प्रस्तुत विषयी यंत्रसामुग्रीसाठी येणारा खर्च संबंधित संस्थेस खालील लेखाशीर्षातंर्गत जिल्हा वार्षिक योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.-

मागणी क्र. ओ-६३

४२१०	-	वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च
०३	-	वैद्यकिय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन
१०५	-	विषमचिकित्सा
(५५)	-	जिल्हा योजना- नागपूर उपशिर्ष (५५)
(०१)	-	रुग्णालयासाठी यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी (४२१० १५११)
५२	-	यंत्रसामुग्री व साधनसामुग्री

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/ विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग-

२, अनुक्रमांक-३, नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२८१६५६५१५८५१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUDHIR
JAYA
SHETTY

Digitally signed by SUDHIR JAYA SHETTY
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E9D37D499A521B728AEB3DC8EC38B759420308B9FD7816002B4AF0FFBF1111D7, cn=SUDHIR JAYA SHETTY
Date: 2026.07.28 19:19:19 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त (वै.शि.), वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
२) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
३) महालेखाकार - १/२ (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
५) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
७) निवडनस्ती (प्रशा-१)